RNI No. MAHBIL/2012/48433
www.dgps.maharashtra.gov.in.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक – पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १५, अंक - ३ ] गुरुवार ते बुधवार, जानेवारी १५ - २१, २०२६ / पौष २५ ते माघ १, शके १९४७ [ पृष्ठे-१७

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय/संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

### जिल्हाधिकारी यांजकडून

**जिल्हा सातारा**

*भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ पोट-कलम (१) अन्वये*

### प्रारंभिक अधिसूचना

क्रमांक भूसं/कावि-१८००/ई-२५०३८७८/२०२५.— ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड *(इ)* च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(झेड ऐ)* मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेले, जिल्हाधिकारी, सातारा यांना यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ पोट-कलम *(१)* च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम *(१)* अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनींचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धिपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(५)* अनुसार जिल्हाधिकारी, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उपनियम *(३)* द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचेदेखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई, जिल्हा सातारा यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**

**संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन**

**जिल्हा सातारा, तालुका खंडाळा, नायगाव**

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टर/आरमध्ये) | चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | १३१९ | ०.१९ | ओढा | १३२० | १३२५ | ओढा |
| २. | १३२० | ०.०२ | १३१९ | १३२२ | १३२३ | ओढा |
| ३. | १३२१ | ०.०३ | १३२२ | ओढा | १३४३ | ओढा |
| ४. | १३२२ | ०.०२ | १३२० | १३२१, ओढा | १३४३ | ओढा |
| ५. | १३२३ | ०.१९ | १३२५, १३२६ | १३४३ | १३२४ | १३२० |
| ६. | १३२४ | ०.०३ | १३२८ | १३४३ | १३२०, १३२८ | १३२३, १३२६ |
| ७. | १३२५ | ०.०४ | ओढा | १३२३ | १३२६ | १३१९ |
| ८. | १३२६ | ०.०६ | ओढा | १३२३ | १३२४ | १३२५ |
| ९. | १३२७ | ०.४७ | १३२८ | १३४३ | १३४२ | १३२४ |
| १०. | १३२८ | ०.८७ | १३२९ | १३२७ | १३३८, १३३९ | १३२४ |
| ११. | १३३८ | ०.५१ | १३३७ | १३३९, १३४० १३४१. | १३३६ | १३२८, १३२९ |
| १२. | १३३९ | ०.१६ | १३३८ | १३४२ | १३४० | १३२८ |
| १३. | १३४० | ०.०७ | १३३८ | १३४२ | १३४१ | १३३९ |
| १४. | १३४२ | ०.२८ | १३४०, १३४१ | १३४३ | १३३६ | १३२७, १३३९ |
| १५. | १३४३ | २.१० | १३२३, १३२४, १३२७, १३४२. | १३४४, ओढा | १३४५, १३५८ | १३२१, १३२२ |
| १६. | १३४४ | ०.२३ | १३४३, १३४५ | ओढा | १३४५ | ओढा |
| १७. | १/पै./२ | ०.२४ | ओढा | २, ३३, ३६ | २, ओढा | ३८, ३९, ४० |
| | **एकूण** | **५.५१** | | | | |

## अनुसूची - दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** :- ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक व महिला प्रशिक्षण केंद्र.

**प्रकल्पाचे वर्णन** :- ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक व महिला प्रशिक्षण केंद्र, मौजे नायगाव, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा येथे बांधकाम करणे.

**समाजाला मिळणारे लाभ** :- अ) ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक व महिला प्रशिक्षण केंद्र, नायगाव, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा या कामासाठी संपादित होणाऱ्या जमीन ५.५१ हे. आर मुळे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारकासाठी जागा उपलब्ध होणार असून महिलांसाठी प्रशिक्षण केंद्र निर्माण होणार आहे.

आ) ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक या प्रकल्पामुळे स्थानिक नागरिकांच्या व्यवसायास लाभ मिळून आर्थिक व सामाजिक विकास होणार आहे.

क) महिला प्रशिक्षण केंद्र, नायगाव, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा या प्रकल्पामुळे महिलांसाठी प्रशिक्षण केंद्र उपलब्ध झाल्यामुळे महिलांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

## अनुसूची - तीन

### बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

प्रस्तावित संपादनामुळे बाधित व्यक्तींचे विस्थापन होत नाही.

## अनुसूची - चार

### (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निधीचा सारांश)

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील प्रकरण-एक मध्ये नमूद कलम ४ ते ६ नुसार ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक व महिला प्रशिक्षण केंद्र, मौजे नायगाव, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा या प्रकल्पास उक्त भूमी संपादन अधिनियम, २०१३ मधील तरतुदीच्या अनुषंगाने सामाजिक आघात निर्धारण (Social Impact Assessment ची आवश्यकता नाही.

## अनुसूची - पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम - लागू नाही.

(ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता - प्रश्न उद्भवत नाही.

(क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अधिसूचनेचा तपशील - प्रश्न उद्भवत नाही.

**टीप :-** उक्त जमिनींच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई, प्रशासकीय इमारत, सोनगीरवाडी, वाई, तालुका वाई, जिल्हा सातारा या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनींची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याचे कलम ११ चे पोट-कलम *(१)* खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई, प्रशासकीय इमारत, सोनगीरवाडी, वाई, तालुका वाई, जिल्हा सातारा यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**संतोष चंद्रकांत पाटील,**

सातारा, २९ डिसेंबर २०२५. जिल्हाधिकारी, सातारा.

## उपविभागीय अधिकारी यांजकडून

*महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ याच्या कलम ३२ (२) अन्वये*

## शुद्धिपत्रक

क्रमांक भूसंपादन/कावि/१८३०/२४/दुरुस्ती/२०२६.— ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी, माढा विभाग, कुर्डुवाडी यांचेकडील अधिसूचना क्रमांक भूसंपादन/कावि-१३५९/२०२५, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२ *(२)* अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणीमध्ये गुरुवार बुधवार, सप्टेंबर १८-२४, २०२५, पृष्ठे ४९ ते ५२ वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

त्यामध्ये प्रस्तुत अधिसूचनेतील नमूद केलेल्या जमिनींपैकी रेल्वे व पाझर तलाव याकरिता क्षेत्र संपादित झालेले असलेने, तसेच ७/१२ प्रत्यक्ष क्षेत्र व अधिसूचनेतील क्षेत्र यामध्ये तफावत असलेने या शुद्धिपत्रान्वये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

## अनुसूची

### जिल्हा सोलापूर, तालुका माढा, गाव मोडनिंब

### याऐवजी

| भूसंपादन अधिकारी | अ.क्र. | भूमापन क्र. / गट क्रमांक | क्षेत्र हेक्टर आर | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| उपविभागीय अधिकारी, माढा विभाग, कुर्डुवाडी. | १५ | १८३ | १.५२ | ०.५० |
| | १६ | १८४/१ | १.४१ | ०.६० |
| | १७ | १८४/२ | १.४२ | ०.५५ |
| | २३ | १८७/१ | ११.८४५० | ०.९५ |
| | ४१ | १९६/१ | १.४७ | ०.९० |
| | ४६ | १९८/१/१ | ३.१० | ३.५० |
| | ४९ | २०१/१ | ०.९२ | १.३४ |
| | ५७ | २०७ /१ | ४.०३ | २.०० |
| **जिल्हा सोलापूर, तालुका माढा, गाव सोलंकरवाडी** | | | | |
| | १ | १७७ | ८.५२ | २.५५ |
| | ३ | १८० | ७.४४ | ३.४५ |
| | ४ | १८१/२ | ३.३५ | १.०० |
| | ५ | १८१/३ | २२.८७ | ०.९५ |

### असे वाचावे

| भूसंपादन अधिकारी | अ.क्र. | भूमापन क्र. / गट क्रमांक | क्षेत्र हेक्टर आर | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| उपविभागीय अधिकारी, माढा विभाग, कुर्डुवाडी. | १५ | १८३ | १.२५ | ०.५० |
| | १६ | १८४/१ | १.३४ | ०.४३ |
| | १७ | १८४/२ | १.३५ | ०.३९ |
| | २३ | १८७/१ | १.८४५० | ०.९५ |

**अनुसूची**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| | ४१ | १९६/१ | १.२८ | ०.७८ |
| | ४६ | १९८/१/१ | १.२० | १.७० |
| | ४९ | २०१/१ | ०.४७ | ०.८४ |
| | ५७ | २०७/१ | ३.८७ | २.०० |
| | **जिल्हा सोलापूर, तालुका माढा, गाव सोलंकरवाडी** | | | |
| | १ | १७७ | ८.५३ | २.५५ |
| | ३ | १८० | ७.५१ | ३.४५ |
| | ४ | १८१/२ | ३.६६ | १.०० |
| | ५ | १८१/३ | ३.१२ | ०.९५ |

ज्यासाठी जमिनी आवश्यक आहे ते प्रयोजन -- मोडनिंब औद्योगिक क्षेत्राकरिता.

**जयश्री आव्हाड,**
उपविभागीय अधिकारी,
माढा विभाग, कुर्डुवाडी.

कुर्डुवाडी, २२ डिसेंबर २०२५.

---

**जिल्हाधिकारी यांजकडून**

**वाचा :-** १) मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे (महसूल शाखा) यांचेकडील पत्र क्र. मह/आस्था-२/आरआर/१९७/२०२५, दिनांक १ एप्रिल २०२५.

२) मा. जिल्हाधिकारी, पुणे (महसूल शाखा) यांचेकडील क्र. पमम/कावि/२४९/२०२५, दिनांक २१ एप्रिल २०२५.

३) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील अधिसचूना क्र. परीक्षा-१०९३/प्र.क्र.२६९/ई-१०, दिनांक २९ ऑक्टोबर १९९७.

४) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. विपधो-२६२०/प्र.क.१६/का.१७, दिनांक ३१ मार्च २०२१.

५) या कार्यालयाकडील पत्र क्र. आस्था/कावि/१४०/२०२५, दिनांक २२ एप्रिल २०२५.

६) या कार्यालयाकडील अधिसूचना क्र. आस्था/कावि/२५७/२०२५, दिनांक १९ सप्टेंबर २०२५.

**शुद्धिपत्रक**

क्रमांक आस्था/कावि-२६०/२०२५.— उपविभागीय अधिकारी, दौंड, उपविभाग दौंड यांचेकडील क्र. आस्था/कावि/२५७/२०२५, दिनांक १९ सप्टेंबर २०२५ अन्वये ग्राम महसूल अधिकारी यांचे विभागीय दुय्यम सेवा परीक्षा जुलै २०२४ चा निकाल प्रसिद्ध करण्यात आलेला होता. सदर अधिसूचनेमध्ये यापूर्वी सूट मिळालेले विषय व आताच्या परीक्षेत सूट मिळवून सर्व विषयांत पास झालेले ग्राम महसूल अधिकारी यांची स्वतंत्र यादी सदर अधिसूचनेत न करता ती अनुत्तीर्ण या सदरात समाविष्ट झालेले असलेमुळे सदर ग्राम महसूल अधिकारी यांची दुरुस्त यादी या शुद्धिपत्रकाद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ज्याअर्थी, मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे व मा. जिल्हाधिकारी, पुणे यांनी वाचले क्र. १ व २ अन्वये दिलेल्या वेळापत्रकानुसार पुणे जिल्ह्यातील महसूल खात्यातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) कर्मचारी यांची विभागीय दुय्यम सेवा परीक्षा (जुलै २०२४ ) दिनांक ५ मे २०२५ ते ८ मे २०२५ या कालावधीत आयोजित करणेत आलेली होती.

ज्याअर्थी, पुणे जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालय व उपविभागीय अधिकारी कार्यालय यांना त्यांचे अधिपत्याखालील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) संवर्ग यांची (जुलै - २०२४ ) दिनांक ५ मे २०२५ ते दिनांक ८ मे २०२५ या कालावधीत आयोजित केलेल्या परीक्षेसाठी परीक्षार्थी म्हणून बसणेसाठी इच्छुक असलेल्या कर्मचारी यांची माहिती आजपर्यंत घेतलेल्या संधीसह विहित नमुन्यात मुदतीत या कार्याललयाकडे सादर केली आहे.

ज्याअर्थी, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) संवर्गातील पात्र कर्मचारी यांना पुणे जिल्ह्यातील महसूल खात्यात सेवेत दाखल झालेपासून चार वर्षात संधी घेऊन विभागीय दुय्यम सेवा परीक्षा उत्तीर्ण झाले नाहीत अशा कर्मचाऱ्यांना त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेली विशेष संधी देऊन माहे जुलै-२०२४, दिनांक ५ मे २०२५ ते दिनांक ८ मे २०२५ या कालावधीत होणाऱ्या विभागीय दुय्यम सेवा परीक्षेस बसण्यास वाचले क्र. ४ अन्वये परवानगी देणेत आलेली होती.

त्याअर्थी, मी, जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी, पुणे खाली नमूद केलेप्रमाणे महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील अधिसचूना क्रमांक परीक्षा १०९३/प्र.क्र.२६९/ई-१०, दिनांक २९ ऑक्टोबर १९९७ मधील तरतुदीनुसार माहे जुलै-२०२४, दिनांक ५ मे २०२५ ते दिनांक ८ मे २०२५ या कालावधीत झालेल्या विभागीय दुय्यम सेवा परीक्षेचा दुरुस्त निकाल या शुद्धिपत्रकान्वये खालीलप्रमाणे जाहीर करीत आहे.

नियम १२ अन्वये प्रथम संधीमध्ये सर्व विषयांत ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त झाल्याने खालील कर्मचारी उत्तीर्ण झालेले आहेत.

**परिशिष्ट**

| अ.क्र. | बैठक क्रमांक | कार्यालयाचे नाव | कर्मचाऱ्याचे नाव | विषय नाव व प्राप्त गुण | | | | ७० टक्केपेक्षा जास्त गुण मिळालेले विषय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | महसूल बाबी १ २०० पैकी | महसूल बाबी २ २०० पैकी | महसूल लेखा संहिता १०० पैकी | संकीर्ण १०० पैकी | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | १३९ | तहसील पुरंदर | खंडागळे ऋषीकेश अनिल | १६७ | ११७ | ७३ | ६१ | महसूल बाबी १ |
| २. | १६६ | तहसील दौंड | सचिन पोपट येडे | १६५ | १२१ | ७० | ५६ | महसूल बाबी १ |
| ३. | १६७ | तहसील दौंड | अक्षय रामदास येडे | १५५ | १०१ | ६८ | ६१ | महसूल बाबी १ |
| ४. | १३४ | तहसील खेड | कोपर्डे भाग्यश्री मलप्पा | १४५ | ११७ | ७० | ५३ | -- |
| ५. | ११८ | तहसील मुळशी | मुऱ्हे नवनाथ रंगनाथ | १३५ | १०७ | ६९ | ६२ | -- |
| ६. | १३२ | अपर लोणी काळभोर | विनायक संजय शिंदे | १३६ | १०० | ७० | ६० | -- |
| ७. | १४२ | तहसील पुरंदर | दत्तात्रय विनायक जगदाळे | १२९ | १०१ | ६७ | ५७ | -- |
| ८. | ८३ | तहसील दौंड | गायकवाड पल्लवी सुभाषराव | १४३ | १०१ | ६७ | ५१ | -- |
| ९. | १४६ | अपर पिंपरी-चिंचवड | शेलार किशोर विष्णू | १३० | १०७ | ६१ | ५२ | -- |
| १० | १३७ | तहसील वेल्हे | पवार कृष्णात रामचंद्र | ११९ | १०१ | ७२ | ५६ | -- |
| ११. | १३१ | तहसील भोर | जाधव राजेश रघुनाथ | ११३ | १०२ | ६१ | ५३ | -- |
| १२. | १४४ | तहसील जुन्नर | गवारी आशिष शिवाजी | १०८ | १०६ | ५२ | ५७ | -- |
| १३. | १६८ | तहसील दौंड | गोविंद काशिनाथ शिंदे | १०० | १०० | ६७ | ५३ | -- |
| १४. | १७४ | तहसील बारामती | जाधव शिवप्रसाद वसंत | १५९ | ११० | ७१ | ५८ | -- |

उपरोक्त उमेदवारांना ७० टक्के किंवा अधिक गुण मिळविलेल्या विषयाचे क्रमांक संबंधित उमेदवाराच्या स्तंभ क्रमांक ६ मध्ये नमूद करण्यात आले आहेत. त्याच्या या विशेष गुणवत्तेची नोंद त्यांच्या गोपनीय अहवालात घेणेत यावी.

१) नियम १३ अन्वये यापूर्वी काही विषयात सूट मिळालेले व उर्वरित विषयात आता सूट मिळाल्याने खालील ग्राम महसूल अधिकारी उत्तीर्ण झालेले आहेत.

## परिशिष्ट

| अ.क्र. | बैठक क्रमांक | कार्यालयाचे नाव | कर्मचाऱ्यांची नावे | या पूर्वीच्या परीक्षेत सूट मिळालेले विषय | या परीक्षेत सूट मिळालेले विषय | प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ९२ | तहसील दौंड | मच्छिंद्र अंकुश पोमण | महसूल बाबी २ | महसूल बाबी १<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | १३०<br>६१<br>८१ |
| २. | ९५ | तहसील दौंड | शामराव बबन सावंत | महसूल बाबी २ | महसूल बाबी १<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | ११९<br>७३<br>७४ |
| ३. | ५९ | तहसील बारामती | माने सतिश जगन्नाथ | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १,<br>संकीर्ण पेपर | १३०<br>६१ |
| ४. | ११५ | तहसील मावळ | आळळीकट्टी राजेश्री विद्याधर | महसूल बाबी १<br>महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | संकीर्ण पेपर | ६० |
| ५. | १०७ | तहसील मावळ | चव्हाण अर्जुन शेषेराव | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १<br>संकीर्ण पेपर | १३२<br>५९ |
| ६. | ९९ | तहसील मावळ | किसन नारायण बोरचाटे | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १<br>संकीर्ण पेपर | १११<br>५७ |
| ७. | ४२ | अपर पिंपरी-चिंचवड | वाळुंज अक्षय रोहिदास | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १<br>संकीर्ण पेपर | १०७<br>५७ |
| ८. | ३४ | तहसील जुन्नर | गेंगजे गौरव युवराज | गौरव महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी- १<br>संकीर्ण पेपर | १०४<br>५७ |
| ९. | १११ | तहसील मावळ | विजय भगवंत जुनारे | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १<br>संकीर्ण पेपर | ११५<br>५६ |
| १०. | ११३ | तहसील मावळ | राहुल धनंजय डोळस | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १<br>संकीर्ण पेपर | १४४<br>५५ |
| ११. | ११६ | तहसील मुळशी | हाळे ललिता शिवाजी | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १<br>संकीर्ण पेपर | १५०<br>५४ |
| १२. | ५७ | तहसील बारामती | केंद्रे राहुल माणिक | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १<br>संकीर्ण पेपर | १०९<br>५२ |
| १३. | ९३ | तहसील दौंड | कोमल सुरज शेंडे | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १<br>संकीर्ण पेपर | ११५<br>५१ |
| १४. | १७ | तहसील भोर | पंकज गुलाब राठोड | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १<br>संकीर्ण पेपर | १४७<br>५४ |
| १५. | २ | तहसील मुळशी | अंजली अर्जुन माने | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १<br>संकीर्ण पेपर | १२५<br>५० |
| १६. | ७९ | तहसील दौंड | मिनाक्षी मिलींद भगत | महसूल बाबी २ | महसूल बाबी १<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | १४०<br>७१<br>५८ |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| १७. | ८४ | तहसील दौंड | मिनाक्षी कैलास सोनवणे | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १६१ |
| १८. | ६२ | तहसील इंदापूर | कालठोणे अनघा जयंत | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १५९ |
| १९. | ६५ | तहसील इंदापूर | मोहिते प्रियंका रमेश | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १५७ |
| २०. | ६१ | तहसील इंदापूर | काळेल स्नेहा हनुमंत | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १४७ |
| २१. | ८९ | तहसील दौंड | निकीता अशोक गायकवाड | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १४७ |
| २२. | ४९ | तहसील बारामती | गायकवाड सोनाली महादेव | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १४४ |
| २३. | ७७ | तहसील शिरूर | गायकवाड आदित्य रंगनाथ | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १४१ |
| २४. | ८७ | तहसील दौंड | मुकेश चंद्रशेखर काथवटे | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १३८ |
| २५. | ८० | तहसील दौंड | वाडेकर कोमल ज्ञानेश्वर | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १३७ |
| २६. | ८१ | तहसील दौंड | गिरी आकांक्षा शिवाजी | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १३४ |
| २७. | १०२ | तहसील मावळ | जाधव बाळू श्रीधर | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १३० |
| २८. | ९१ | तहसील दौंड | कोमल गंगाराम कोकरे | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १२९ |
| २९. | ५४ | तहसील बारामती | जगताप स्नेहा दादा | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १२८ |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ३०. | ३६ | तहसील जुन्नर | खुटाळ पुनम राजेंद्र | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १२६ |
| ३१. | ८५ | तहसील दौंड | छाया विजय दौंडकर | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १२६ |
| ३२. | ८६ | तहसील दौंड | रुपाली अशोक शिंदे | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १२४ |
| ३३. | ६८ | तहसील इंदापूर | ढमे राजश्री अजित | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १२१ |
| ३४. | ९७ | तहसील दौंड | आहिरे सुरज प्रकाश | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | ११८ |
| ३५. | १२ | पुणे शहर | प्रशांत बबन दांगट | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | ११६ |
| ३६. | ३५ | तहसील जुन्नर | लांडे नितीन होना | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | ११६ |
| ३७. | ५६ | तहसील बारामती | निकम आदेश रविंद्र | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १०८ |
| ३८. | ११० | तहसील मावळ | काटे पवन गजानन | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १०८ |
| ३९. | ३७ | तहसील जुन्नर | लांडे वर्षा गोरक्ष | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १०३ |
| ४०. | ४६ | तहसील बारामती | कांबळे संदिप मोहन | महसूल बाबी २ | महसूल बाबी १<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | १५३<br>५७<br>५० |
| ४१. | ८२ | तहसील दौंड | चंदनशिवे ग्रिस्मा शिवाजी | महसूल बाबी २<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १<br>महसूल लेखा संहिता | ११९<br>७३ |
| ४२. | २६ | तहसील वेल्हे | खळदकर निखील चिंतामणी | महसूल बाबी २<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १<br>महसूल लेखा संहिता | १५९<br>६२ |
| ४३. | १०४ | तहसील मावळ | पतंगे पुनम नंदू | महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १<br>महसूल बाबी २ | ११०<br>१०५ |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ४४. | ७१ | तहसील शिरूर | जाणे शुभम लक्ष्मण | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १७३ |
| ४५. | ६६ | तहसील इंदापूर | श्रेया सुरेश तळदेवकर | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १६६ |
| ४६. | ७३ | तहसील शिरूर | साबळे हर्षद बाळासाहेब | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १६४ |
| ४७. | ९४ | तहसील दौंड | तुळशीदास बालाजी रोडे | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १६२ |
| ४८. | ७२ | तहसील शिरूर | पोटावळे संतोष नामदेव | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १६१ |
| ४९. | १०० | तहसील मावळ | आटोळे स्वाती महादेव | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १२३ |
| ५०. | २७ | तहसील पुरंदर | सागर हनुमंत कुचेकर | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १०१ |

(२) खालील उमेदवार या परीक्षेत अनुउत्तीर्ण झाले आहेत, परंतु नियम, १३ अन्वये त्यांच्या नावापुढे नमूद केलेल्या विषयात ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळाल्याने त्यांना त्या विषयात सूट देण्यात आली आहे.

**परिशिष्ट**

| अ.क्र. | बैठक क्रमांक | कार्यालयाचे नाव | कर्मचाऱ्याचे नाव | या पूर्वीच्या परीक्षेत सूट मिळालेले पेपर | या परीक्षेत सूट मिळालेले विषय | प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | १२६ | तहसील मुळशी | शिंदे केशव मारुतराव | -- | महसूल बाबी १<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | १५८<br>७६<br>६४ |
| २. | ४ | तहसील मुळशी | नरखेडकर स्वप्निल श्रीकांत | -- | महसूल बाबी १<br>महसूल लेखा संहिता | १६०<br>५७ |
| ३. | १० | तहसील मुळशी | ऋषिकेश तिर्थगिरी गोसावी | -- | महसूल बाबी १<br>महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | १३४<br>१०८<br>५८ |
| ४. | १६५ | तहसील दौंड | जंजिरे संदीप सोपान | -- | महसूल बाबी १<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | १३९<br>६१<br>५४ |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ५. | १५८ | तहसील इंदापूर | चौधरी दीपिका मगनलाल | -- | महसूल बाबी १ | १४८ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ५७ |
| | | | | | संकीर्ण पेपर | ५६ |
| ६. | १४९ | तहसील बारामती | धायगुडे अंकुश मल्हारी | -- | महसूल बाबी १ | १५१ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ५२ |
| ७. | ५ | तहसील मुळशी | वसुंधरा विठ्ठलराव केंद्रे | -- | महसूल बाबी १ | १३२ |
| | | | | | महसूल बाबी २ | १०५ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ६६ |
| ८. | १४८ | तहसील बारामती | पाटोळे बाळू वसंत | -- | महसूल बाबी १ | १३७ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ५५ |
| ९. | १३५ | तहसील खेड | जांभळे विशाल सीताराम | -- | महसूल बाबी १ | ११३ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ६७ |
| | | | | | संकीर्ण पेपर | ५८ |
| १०. | १७० | तहसील मावळ | राजपुरे गहिनीनाथ वामन | -- | महसूल बाबी १ | १३८ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ५६ |
| ११. | १ | तहसील मुळशी | चव्हाण तेजस अशोक | -- | महसूल बाबी १ | १४८ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ५३ |
| १२. | १६३ | तहसील शिरूर | भालेराव शलाका अशोक | -- | महसूल बाबी १ | १४२ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ५९ |
| १३. | १५३ | तहसील बारामती | पाटील सुहास पांडुरंग | -- | महसूल बाबी १ | १४९ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ५६ |
| १४. | १२९ | तहसील भोर | शिनगारे शेखर शंकर | -- | महसूल बाबी २ | १०० |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ६७ |
| | | | | | संकीर्ण पेपर | ६२ |
| १५. | १५० | तहसील बारामती | महानवर सविता बाबु | -- | महसूल बाबी १ | १३५ |
| १६. | १२५ | तहसील मुळशी | रवींद्र रघुनाथ दगड | -- | महसूल बाबी १ | ११५ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ५६ |
| | | | | | संकीर्ण पेपर | ५४ |
| १७. | १४५ | तहसील जुन्नर | म्हांबरे ऋतुजा सोमनाथ | -- | महसूल बाबी १ | १२६ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ६२ |
| | | | | | संकीर्ण पेपर | ५२ |
| १८. | १७१ | तहसील मावळ | साळुंखे प्रवीण सुरेश | -- | महसूल बाबी १ | १२८ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ५४ |
| १९. | १३३ | अपर लोणी काळभोर | वाकोडे मिलींद रमेश | -- | महसूल बाबी १ | १३१ |
| | | | | | संकीर्ण पेपर | ५८ |
| २०. | १५४ | तहसील बारामती | अहिरे संदीप दत्तात्रय | -- | महसूल बाबी १ | १४१ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ५५ |
| | | | | | संकीर्ण पेपर | ५० |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| २१. | १४७ | तहसील बारामती | पारेकर भगवंत काशिराम | -- | महसूल बाबी १ | ११८ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ६३ |
| | | | | | संकीर्ण पेपर | ५० |
| २२. | १२१ | तहसील मुळशी | एकुंडे नितीन रामराव | -- | महसूल बाबी १ | १०४ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ५१ |
| | | | | | संकीर्ण पेपर | ५४ |
| २३. | १३६ | तहसील खेड | लाटे उज्वला दत्तात्रय | -- | महसूल बाबी १ | ११७ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ५५ |
| | | | | | संकीर्ण पेपर | ५१ |
| २४. | १४१ | तहसील पुरंदर | मयुर सोमनाथ पाटोळे | -- | महसूल लेखा संहिता | ५८ |
| | | | | | संकीर्ण पेपर | ६२ |
| २५. | १५५ | तहसील बारामती | घोरपडे दिगंबर यशवंत | -- | महसूल बाबी १ | १५१ |
| २६. | १२७ | तहसील पुणे शहर | हर्षदा बाबुराव देशमुख | -- | महसूल लेखा संहिता | ६४ |
| | | | | | संकीर्ण पेपर | ५७ |
| २७. | १५१ | तहसील बारामती | कोरपड प्रतिक्षा धनसिंग | -- | महसूल बाबी १ | १०९ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ५१ |
| | | | | | संकीर्ण पेपर | ५१ |
| २८. | १३० | तहसील भोर | मासाळ शुभम कृष्णाथ | -- | महसूल लेखा संहिता | ५३ |
| २९. | १५६ | तहसील बारामती | रंधवे किरण सुनील | -- | महसूल बाबी १ | १३७ |
| ३०. | १२८ | तहसील भोर | डोंगरे अनुराधा भाऊराव | -- | महसूल बाबी १ | १२० |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ६० |
| ३१. | १५२ | तहसील बारामती | जगताप अतिश सुरेंद्र | -- | महसूल बाबी १ | १३२ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ५१ |
| ३२. | ६७ | तहसील इंदापूर | जगताप अभिलेश दादु | -- | महसूल बाबी १ | १२६ |
| ३३. | १२३ | तहसील मुळशी | विशाल दत्तात्रय पवार | -- | महसूल बाबी १ | १०३ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ६१ |
| ३४. | १४० | तहसील पुरंदर | तुळशीदास दयाराम चौधरी | -- | महसूल लेखा संहिता | ५४ |
| | | | | | संकीर्ण पेपर | ५७ |
| ३५. | १६२ | तहसील शिरूर | वाळके सचिन भाऊ | -- | महसूल बाबी १ | ११३ |
| ३६. | २९ | तहसील पुरंदर | म्हेत्रे महेंद्र बबन | -- | महसूल बाबी १ | १३२ |
| ३७. | १६९ | तहसील हवेली | गारकर माणिक बजरंग | -- | महसूल बाबी १ | १२७ |
| ३८. | १२२ | तहसील मुळशी | सिद्राम रमेश पुरी | -- | महसूल बाबी १ | ६८ |
| | | | | | संकीर्ण पेपर | ५४ |
| ३९. | ८ | तहसील मुळशी | पवळे सूरज लक्ष्मण | -- | महसूल लेखा संहिता | ५० |
| ४०. | ४८ | तहसील बारामती | गजभिये श्रावणी भाऊराव | -- | महसूल बाबी १ | १०४ |
| | | | | | महसूल लेखा संहिता | ६२ |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ४१. | ११७ | तहसील आंबेगाव | म्हसकर संदीप किसन | -- | महसूल लेखा संहिता | ६० |
| ४२. | ९८ | पुनर्वसन शाखा, पुणे | अविनाश बाळासाहेब मोडक | -- | महसूल लेखा संहिता | ५६ |
| ४३. | १०५ | तहसील मावळ | जगन्नाथ ललित दळवी | -- | संकीर्ण पेपर | ५१ |
| ४४. | ५१ | तहसील बारामती | सुळ मोनिका आनंदराव | -- | महसूल बाबी १ | १५१ |
| ४५. | ९३ | तहसील दौंड | अजिंक्य शहाजी पाटोळे | महसूल बाबी २ | महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | ६४<br>६१ |
| ४६. | ९० | तहसील दौंड | प्राजक्ता सुरेश भाईक | -- | महसूल बाबी १<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | ११७<br>५४<br>६१ |
| ४७. | ३९ | तहसील जुन्नर | टण्णू आदित्य सुहास | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | संकीर्ण पेपर | ६१ |
| ४८. | १२० | तहसील मुळशी | थोरात विवेक काशिनाथ | -- | महसूल बाबी १<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | १४०<br>५१<br>५९ |
| ४९. | ४७ | तहसील बारामती | प्रभाकर देवसायम गोलापल्ली | महसूल बाबी २ | महसूल लेखा संहिता | ५० |
| ५०. | १०६ | तहसील मावळ | खांडभोर गणेश नथू | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | संकीर्ण पेपर | ५२ |
| ५१. | १६४ | तहसील शिरूर | मुंढे सुग्रीव विठ्ठलराव | -- | महसूल बाबी १<br>महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | ११६<br>६१<br>५१ |
| ५२. | ८८ | तहसील दौंड | कोमल रतिलाल सोलंकी | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | १२९ |
| ५३. | ३३ | तहसील जुन्नर | सलामे शामराव नंदलाल | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | ११९ |
| ५४. | ७ | तहसील मुळशी | घाडगे निकीता दयानंद | -- | महसूल बाबी १<br>महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | १६९<br>१०५<br>७१ |
| ५५. | २४ | तहसील खेड | जगताप अनिल श्रीपती | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | १६७ |
| ५६. | ३१ | तहसील जुन्नर | पांदे संतोष वसंतराव | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | १०९ |
| ५७. | १०१ | तहसील मावळ | इंगुळकर प्रसाद शंकर | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल १ | १०९ |
| ५८. | २५ | तहसील खेड | मोरे राजेंद्र आप्पासाहेब | महसूल बाबी २ | महसूल बाबी १ | ११० |
| ५९. | २२ | तहसील खेड | नेहुल अमोल रामभाऊ | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | १५८ |
| ६०. | ७४ | तहसील शिरूर | वाघमारे सिद्धार्थ सुग्रीव | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | १२६ |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ६१. | ६३ | तहसील इंदापूर | भोकटे प्रसाद मारुती | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | १३५ |
| ६२. | ५८ | तहसील बारामती | साठे केशव देविदास | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | १०७ |
| ६३. | १८ | तहसील भोर | चैत्राली अमोल जाधव | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | १३४ |
| ६४. | ३ | तहसील मुळशी | किरण प्रदीप सुरवसे | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | १२८ |
| ६५. | २१ | तहसील खेड | गोरे विशाल चंद्रकांत | महसूल बाबी २ | महसूल बाबी १<br>महसूल लेखा संहिता | १०९<br>५३ |
| ६६. | १४ | पुणे शहर | गणेश सुनीलराव चौधर | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | १४१ |
| ६७. | २० | अपर लोणी काळभोर | महेश मिरावली वाघमारे | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | १३६ |
| ६८. | ७५ | तहसील शिरूर | घरदाळे नितीन बाळू | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | ११९ |
| ६९. | ५५ | तहसील बारामती | कदम अक्षय तुकाराम | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | १०३ |
| ७०. | ६० | तहसील इंदापूर | कांबळे सांची संदीप | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | १५० |
| ७१. | ५२ | तहसील बारामती | भागवत वंदना महेंद्र | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | १४४ |
| ७२. | १९ | तहसील भोर | हिमाणी भास्कर चोपडे | महसूल बाबी २ | महसूल बाबी १ | ११८ |
| ७३. | १७३ | तहसील बारामती | धुमाळ अभिषेक विठ्ठल | -- | महसूल बाबी १ | ११६ |
| ७४. | ७६ | तहसील शिरूर | नवले पांडुरंग किसन | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | १११ |
| ७५. | ५० | तहसील बारामती | थोरात पल्लवी रामदास | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | ११७ |
| ७६. | ५३ | तहसील बारामती | आगम किरण महादेव | महसूल बाबी २<br>महसूल लेखा संहिता | महसूल बाबी १ | ११० |
| ७७. | १०३ | तहसील मावळ | कारदरेकर सुरेश जगन | संकीर्ण पेपर | महसूल बाबी १<br>महसूल लेखा संहिता | १५२<br>५६ |
| ७८. | ७० | तहसील शिरूर | भालेराव मनीषा भीमराव | महसूल लेखा संहिता<br>संकीर्ण पेपर | महसूल बाबी १ | १२२ |
| ७९. | १३ | पुणे शहर | स्मिता सचिन आवणकर | महसूल बाबी २ | महसूल लेखा संहिता | ५८ |

**जितेंद्र डुडी,**

पुणे, ३० सप्टेंबर २०२५.

जिल्हाधिकारी, पुणे.

## शहर अभियंता यांजकडून

## पुणे महानगरपालिका, पुणे

*भांबुर्डा, शिवाजीनगर, अंतिम भूखंड क्र. ४७८/१-अ व ४७८/१-ब येथील मिळकतीचे मालकांच्या नावातील बदलाबाबत एम.आर.टी.पी. ॲक्ट, १९६६ चे कलम ९१ (२) नुसार*

### जाहीर प्रकटन

क्रमांक पुणे मनपा/बां.वि.क्र.६/८६८३/२०२६.— ज्याअर्थी, भांबुर्डा, शिवाजीनगर, अंतिम भूखंड क्र. ४७८/१-अ (भूखंडधारक श्री. मनोहर विष्णू जोशी) व अंतिम भूखंड क्र. ४७८/१-ब (भूखंडधारक श्रीमती शकुंतला वसंतराव जोशी) असे नगर योजना क्र. १ च्या 'बी' फॉर्ममध्ये नमूद आहे. परंतु नावामध्ये अदलाबदल झाली असल्याने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, जा.क्र. टीपीएस-१८२५/६७७/प्र.क्र.१४८/२०२५/नवि-१३, दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजीचे आदेशान्वये चेअरमन / सेक्रेटरी, शकुंतला अपार्टमेंट व आशिष अपार्टमेंट यांनी त्यामध्ये दुरुस्ती होणेसाठी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

सदर मंजूर नगर योजना क्र. १ च्या 'बी' फॉर्ममध्ये अंतिम भूखंड क्र. ४७८/१-अ व अंतिम भूखंड क्र. ४७८/१-ब या दोन भूखंड मालकांची नावे, भूखंड क्षेत्र या बाबींचा तपशील खालीलप्रमाणे दिलेला आहे.

**तक्ता - अ**

| 'बी' फॉर्म मधील अ.क्र. | अंतिम भूखंड क्रमांक | भूखंडधारक मालकाचे नाव | भूखंड क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २३३९ | ४७८/१-अ | मनोहर विष्णू जोशी | ५५७६ चौ. फूट (५१७.९९ चौ.मी.) |
| २३४० | ४७८/१-ब | शकुंतला वसंतराव जोशी | ५५६३ चौ. फूट (५१४.९६ चौ.मी.) |

दिनांक ५ जुलै १९७९ रोजी टी.पी. योजना मंजूर होणेपूर्वी जागेवर पुणे महानगरपालिकेकडून दिलेली विकसनाची परवानगी व त्यानुसार प्रत्यक्षात झालेला विकास याची वस्तु:स्थिती पाहता, सदर मंजूर नगर रचना योजनेच्या फॉर्म - 'बी' वर अंतिम भूखंड क्र. ४७८/१-अ व अंतिम भूखंड क्र. ४७८/१-ब या भूखंडधारक मालकांच्या नोंदविलेल्या नावांमध्ये अदलाबदल झालेला दिसून येतो. ही बाब नगर रचना योजनेच्या फॉर्म-१ वर मालकी हक्काचा तपशील नोदवितांना झालेली त्रुटी किंवा नजरचुकीने झालेली नोंद असू शकते.

त्याप्रमाणे दाखल प्रस्तावासोबत जोडलेल्या कागदपत्रांनुसार पुणे महानगरपालिकेकडून बांधकाम परवानगीमधील उपलब्ध झालेल्या कागदपत्रांनुसार सि.स.नं. १०९७/१ ची सिटी सर्व्हे विभागाकडील सन १९७१ मध्ये देण्यात आलेली मिळकत पत्रिका यामध्ये सि.स.नं १०९७/१, भांबुर्डा, क्षेत्रफळ १०३२ चौ.मी. व फायनल प्लॉट ४७८ असे नमूद आहे, तर मिळकतधारक म्हणून "मनोहर विष्णू जोशी" व "शकुंतला वसंतराव जोशी" यांची नावे आहेत.

भूखंड क्र. ४७८/१अ वरील मंजूर बांधकाम परवानगी दिनांक ५ जुलै १९७९ रोजी योजना मंजूर होणे पूर्वीच दिनांक ८ ऑक्टोबर १९७५ रोजी त्यावेळेचे मूळ सि.स.नं. १०९७/१ मधील उपभूखंड क्र. सि.स.नं. १०९७/१-अ (न.र.यो. मधील भूखंड क्र. ४७८/१-अ) या भूखंडाखालील जागेचे मालक म्हणून "शकुंतला वसंतराव जोशी" यांना या भूखंडावर, पुणे महानगरपालिकेकडून विकास परवानगी प्राप्त झालेली होती व त्यानंतर वेळोवेळी सुधारित परवानग्या घेऊन जागेवर इमारत बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. यानुसार विकसित इमारतीस पुणे महानगरपालिकेकडून अंतिमत: भोगवटा प्रमाणपत्र दिनांक १० ऑक्टोबर १९७९ रोजी प्राप्त झालेले आहे. सदर विकसित इमारतीचे नाव "शकुंतला अपार्टमेंट" असे आहे.

भूखंड क्र. ४७८/१ब वरील मंजूर विकास परवानगीबाबत न.र.यो. मधील भूखंड क्र. ४७८/१-ब या सि.स.नं. १०९७/१ मधील उपभूखंड (सि.स.नं. १०९७/१-ब) या खालील जागेचे मालक म्हणून "मनोहर विष्णू जोशी" यांना या भूखंडावर, पुणे महानगरपालिकेकडून जा.क्र. ७२५७, दिनांक २९ मार्च १९८२ रोजी प्रथम विकास परवानगी मंजूर करण्यात आलेली आहे व सुधारित विकास परवानगी जा.क्र. ८०३२, दिनांक ५ डिसेंबर १९८९ रोजी मंजूर करण्यात आलेली आहे. त्यानंतर जागेवर इमारत बांधकाम पूर्ण करण्यात आले असून पुणे महानगरपालिकेकडून दिनांक २१ फेब्रुवारी १९९१ रोजी भोगवटा देण्यात आला आहे. यानुसार विकसित इमारतीचे नाव "आशिष अपार्टमेंट" असे आहे.

सन १९७९ पूर्वीची कागदपत्रे, मूळ मिळकत पत्रिका, सन १९७२ चा मोजणी नकाशानुसार वहिवाट व त्यानुसार महानगरपालिकेकडून सन १९७५ मध्ये देण्यात आलेली विकास परवानगी यावरून सि.स.नं. १०९७/१ मधील प्लॉट नंबर १ च्या दोन उपभूखंडापैकी अंतिम भूखंड क्रमांक ४७८/१-अ चे क्षेत्र ५१७.९९ चौ.मी. हा "शकुंतला वसंतराव जोशी" यांचा आहे तर अंतिम भूखंड क्र. ४७८/१-ब चे क्षेत्र ५१४.९६ चौ.मी. हा "मनोहर विष्णू जोशी" यांचा असल्याचे दिसून येते.

मंजूर नगर रचना योजनेच्या नकाशावर दर्शविलेप्रमाणे मूळ भूखंड क्र. ४७८ मधील उक्त ६ उपभूखंड म्हणजेच (अंतिम भूखंड क्र. ४७८/१अ व ४७८/१६), (अंतिम भूखंड क्र. ४७८/२-अ, व ४७८/२-ब) व (अंतिम भूखंड क्र. ४७८/३-अ व ४७८/३-ब) असे आहेत. लवाद यांच्या निर्णयानुसार नकाशावर उक्त सहा अंतिम भूखंड दर्शविताना भूखंडांचे स्थान योग्य दर्शविलेले आहे. मात्र, अंतिम भूखंड क्र. ४७८/१-अ व अंतिम भूखंड क्र. ४७८/१-ब च्या बाबत (मूळ सि.स.नं. १०९७/१ मधील उपभूखंड सि.स.नं. १०९७/१-अ व उपभूखंड क्र. सि.स.नं. १०९७/१-ब) मंजूर नगर रचना योजनेच्या फॉर्म - 'बी' वर मालकी हक्काचा तपशील नोंदविताना, त्यात मिळकतधारकांच्या नावामध्ये अदलाबदल झाल्याचे दिसून येते.

प्रकरणी वस्तु:स्थितीत दाखल कागदपत्रांवरून 'बी' फॉर्ममध्ये नजरचुकीने त्यांच्या नावात अदलाबदल झाल्याचे दिसून येते. मूळत: श्री. मनोहर विष्णू जोशी यांचे नावे अंतिम भूखंड क्र. ४७८/१-ब व श्रीमती शकुंतला वसंतराव जोशी यांचे नावे अंतिम भूखंड क्र. ४७८/१अ असणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने 'ब' फॉर्ममध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

उक्त दोन्ही अंतिम भूखंड क्र. ४७८/१-अ व ४७८/१-ब मधील मालकी हक्कामध्ये झालेल्या अदलाबदलीमध्ये खालीलप्रमाणे तक्ता 'ब' नुसार दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

**तक्ता - ब**

| अ.क्र. | अंतिम भूखंड क्रमांक | भूखंडधारक मालकाचे नाव | भूखंड क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २३३९ | ४७८/१-अ | शकुंतला वसंतराव जोशी | ५५७६ चौ. फूट (५१७.९९ चौ.मी.) |
| २३४० | ४७८/१-ब | मनोहर विष्णू जोशी | ५५६३ चौ. फूट (५१४.९६ चौ.मी.) |

तरी भांबुर्डा, शिवाजीनगर, अंतिम भूखंड क्र. ४७८/१-अ या भूखंडावर श्रीमती शकुंतला वसंतराव जोशी व अंतिम भूखंड क्र. ४७८/१-ब या भूखंडावर श्री. मनोहर विष्णू जोशी यांची नावे 'बी' फॉर्ममध्ये नमूद करणेसाठी संदर्भान्वये शासन पत्रानुसार हरकती / सूचना मागविणेत येत आहेत. सदर हरकती / सूचना मा. शहर अभियंता, मुख्य इमारत, पहिला मजला, पुणे महानगरपालिका, पुणे-४११ ००५ यांचे कार्यालयाकडे जाहीर प्रकटनाच्या दिनांकापासून १५ दिवसांत दाखल कराव्यात.

**प्रशांत वाघमारे,**
शहर अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे.

पुणे, २ जानेवारी २०२६.

---

**उपसंचालक, भूमी अभिलेख यांजकडून**

*मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७*

**मौजे रोहकडी, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे येथील जमीन एकत्रीकरण योजना कायदा, कलम ३२ *(३)* अन्वये**

**अधिसूचना**

क्रमांक कॉन/ए.क.क.७६९ (पुणे)/एस.आर.-२२८/(जुन्नर)/ई-६४३७११०/२०२५.—मौजे रोहकडी, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे येथील जमीन एकत्रीकरण योजना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, दिनांक १८ जानेवारी १९६८, पृष्ठे ९० वर योजना कायम करण्यात आलेबाबतची अधिसूचना प्रसिद्ध झालेली होती. सदर मंजूर एकत्रीकरण योजनेतील सर्व्हे नंबर ३६/१, २, गट नंबर १९६, १९५ बदल करणे आवश्यक असल्याची खात्री झाल्यामुळे मंजूर एकत्रीकरण योजनेतील प्रस्तावाच्या मसुद्यास उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांनी मान्यता देऊन तो कायदा कलम ३२ *(१)* अन्वये दुरुस्ती योजना मसुदा प्रसिद्धीसाठी जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे, उपअधीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर, तहसीलदार जुन्नर व ग्राम महसूल अधिकारी, रोहकडी, तालुका जुन्नर यांचेकडे पाठविणेत आला होता. सदर मसुदा तहसीलदार, जुन्नर व ग्राम महसूल अधिकारी, रोहकडी यांनी गावी व तहसीलदार कार्यालयाचे नोटिस बोर्डावर प्रसिद्ध केलेला होता, तसेच जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे व उपअधीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर यांनीही त्यांचे कार्यालयाचे नोटिस बोर्डावर मसुदा प्रसिद्ध केला होता. सदरच्या प्रसिद्ध केलेल्या दुरुस्ती योजना मसुद्यावर श्री. रवींद्र काशिनाथ मुरादे यांनी हरकत अर्ज दिलेने सदर हरकतीवर या कार्यालयाकडून हितसंबंधितांना रीतसर नोटिसीने कळवून दिनांक ३० सप्टेंबर २०२५, १४ ऑक्टोबर २०२५ व २८ ऑक्टोबर २०२५ रोजी सुनावणी घेऊन दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी निर्णय पारित केलेला आहे.

सबब, मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणेबाबत व त्याचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम, १९४७ चे कलम ३२ *(३)* मधील तरतुदीनुसार उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे मंजूर योजनेतील गट नंबर १९५, १९६ या गटांची दुरुस्ती योजना मंजूर करीत आहेत.

**विष्णू सावळाराम शिंदे,**
उपसंचालक,
भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे.

पुणे, १९ नोव्हेंबर २०२५.

---

*मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७*

**मौजे लोंढेवाडी, तालुका माढा, जिल्हा सोलापूर येथील जमीन एकत्रीकरण योजना कायदा कलम ३२ *(३)* अन्वये**

**अधिसूचना**

क्रमांक कॉन/ए.क.क.३२१(सोलापूर)/एस.आर.-१०१/(माढा)/ई-६४९६५५८/२०२५.—मौजे लोंढेवाडी, तालुका माढा, जिल्हा सोलापूर येथील जमीन एकत्रीकरण योजना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक- पुणे विभागीय पुरवणी, दिनांक १८ जानेवारी १९६८, पृष्ठ ९० वर योजना कायम करण्यात आलेबाबतची अधिसूचना प्रसिद्ध झालेली होती. सदर मंजूर एकत्रीकरण योजनेतील मौजे लोंढेवाडी, तालुका माढा, जिल्हा सोलापूर येथील सर्व्हे नंबर ४५/१, जुना गट नंबर ४१, नवीन गट नंबर ६७ व सर्व्हे नंबर ४५/२, जुना गट नंबर ४०, नवीन गट नंबर ६६ चे नकाशात बदल करणे आवश्यक असल्याची खात्री झाल्यामुळे मंजूर एकत्रीकरण योजनेतील प्रस्तावाच्या मसुद्यास उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांनी मान्यता देऊन तो कायदा कलम ३२ *(१)* अन्वये दुरुस्ती योजना मसुदा प्रसिद्धीसाठी जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, सोलापूर, उपअधीक्षक, भूमी अभिलेख, माढा, तहसीलदार, माढा व ग्राम महसूल अधिकारी, लोंढेवाडी, तालुका माढा यांचेकडे पाठविणेत आला होता. सदर मसुदा तहसीलदार, माढा व ग्राम महसूल अधिकारी, लोंढेवाडी यांनी गावी व तहसीलदार कार्यालयाचे नोटिस बोर्डावर प्रसिद्ध केलेला होता, तसेच जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, सोलापूर व उपअधीक्षक, भूमी अभिलेख, माढा यांनीही त्यांचे कार्यालयाचे नोटिस बोर्डावर मसुदा प्रसिद्ध केला होता. सदरच्या प्रसिद्ध केलेल्या दुरुस्ती योजना मसुद्यावर कोणाचीही हरकत प्राप्त झालेली नाही. तसा ग्राम महसूल अधिकारी, लोंढेवाडी यांचा दवंडी रजिस्टरचा उतारा व तहसीलदार, माढा यांचा दिनांक २८ जुलै २०२५ चा अहवाल प्रकरणी सामील करणेत आला आहे.

सबब, मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणेबाबत व त्याचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम, १९४७ चे कलम ३२ *(३)* मधील तरतुदीनुसार उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे मंजूर योजनेतील (जुना गट नंबर ४१), नवीन गट नंबर ६७ (जुना गट नंबर ४०), नवीन गट नंबर ६६ या गटांची दुरुस्ती योजना मंजूर करीत आहेत.

**विष्णू सावळाराम शिंदे,**
उपसंचालक,
भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे.

पुणे, १९ नोव्हेंबर २०२५.

---

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI–400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.